महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

---

**अतितात्काळ :**
**कालमर्यादा दि.१२/०२/२०२१**

जा.क्र.तांशिविकापु/विव-१/वृक्षलागवड/२०२१/ 690
दिनांक : 09 FEB 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असणाऱ्या सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका
तसेच व्यावसायिकअभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
**(पुणे विभाग पुणे)**

**विषय :- वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत.**

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३४-दि.०२.०२.२०२१.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक : वायोगो-२०२१/प्र.क्र.१३/तांशि ७, दि.२५.०१.२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत म. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या माहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांच्याकडून, त्या-त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे याबाबतच्या माहितीचा एकत्रित अहवाल संदर्भांकित शासन पत्रासोबतच्या नमून्यात भरुन संचालनालयास तात्काळ पाठविण्याविषयी या विभागीय कार्यालयास सूचित केलेले आहे.

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांच्या संस्थाप्रमुखांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत सन २०१५-१६ ते २०२०-२१ या वर्षात केलेल्या वृक्षलागवडी बाबतची **<u>बिनचूक माहिती</u>** शासनास सादर करावयाची असल्याने, आपल्या संस्थेची एकूण ०६ वर्षांची अचूक व वर्षनिहाय **(06 Entries)** माहिती सोबत **दिलेल्या लिंकवर <u>गुगल फॉर्ममध्ये</u> इंग्रजीत (English) भरुन सादर करण्यात यावी. तसेच सदर माहितीची संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरीची प्रत संस्थेच्या मूळ पत्रासह गुणवत्ता यादी पडताळणीच्या वेळी** या कार्यालयाच्या विद्यार्थी विभागात जमा करावी. ज्या संस्था याबाबतची चुकीची अथवा खोटी माहिती सादर केलेले आढळल्यास, अशा संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी केली जाणार नाही याची **सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : संदर्भिय पत्राची छायांकित प्रत.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३४ दिनांक : ३।२।२०२१

**ईमेलव्दारे**

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत.

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक रासेयो-२०२१/प्र.क्र.१३/साशि-७,
दिनांक २९.१.२०२१**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाकित पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या मोहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांच्याकडून त्या त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे, याबाबतच्या सविस्तर माहितीचा एकत्रित अहवाल संदर्भाकित शासनपत्रासोबतच्या नमुन्यात भरून या संचालनालयास तात्काळ पाठवावा, जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
04 FEB 2021
आवक क्र. 9068

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

E/mansi/mansi/sankirn/sankirnLTR2020(march onwars)